महाराष्ट्र शासन

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे-1.
दूरध्वनी क्र .020-26123826 Email ID:do4.igro@igrmaharashtra.nic.in

---

क्र.का.4/प्र.क्र.193/2021/720 दिनांक - 17 /05/2022.

प्रति,

सह जिल्हा निबंधक मुंबई शहर,मुंबई उपनगर,
ठाणे शहर,ठाणे ग्रामीण,पुणे शहर,पुणे ग्रामीण, सोलापूर
नाशिक, औरंगाबाद,पालघर, रायगड,

विषय- ई-रजिस्ट्रेशन (Form Builder) प्रणाली संदर्भात प्रशिक्षण बाबत.

राज्यात ई-रजिस्ट्रेशन प्रणाली सुरु असून सदर प्रणालीमधील पुढील टप्पा म्हणजे Form Builder प्रणाली अंतर्गत विकसकांचे प्रथम विक्री करारनामा दस्तांची ई रजिस्ट्रेशन प्रणाली अंतर्गत नोंदणी प्रक्रीयेस गती देणेस्तव विभागातील कर्मचारी तसेच Stake Holders यांचे प्रशिक्षण होणे गरजेचे आहे, जेणेकरुन अधिकाधिक प्रथम विक्री करारनामा दस्त सदर प्रणाली अंतर्गत नोंदविणे शक्य होईल व पर्यायाने जनतेस अधिकची सुविधा मिळेल व नोंदणी कार्यालयात होणारी गर्दी कमी होईल.

सदरचे प्रशिक्षणासाठी आपले कार्यक्षेत्रातील ईच्छुक विकासक, वकिल, ASP, CREDAI, MCHI सारख्या संघटना इत्यांदींचा अधिकाधिक सहभाग असणे आवश्यक असल्याने त्या दृष्टीने उपरोक्त प्रमाणे सर्व घटकांसाठी सदरचे प्रशिक्षण सोबत दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आयोजीत करावयाचे आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेणेस्तव आपले स्तरावरुन सर्व संबंधितांना कळविण्यात यावे. तसेच संबंधित सर्व सह जिल्हा निबंधक वर्ग-1 यांनी नोंदणी उपमहानिक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांचे मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे ठिकाण निश्चीत करावे. साधारणत: किमान 30 ते 40 व्यक्ती बसतील एवढया क्षमतेचा कक्ष असणे अपेक्षित आहे. आपले विभागातील CREDAI संघटनेच्या 4 ते 5 सदस्यांना मास्टर ट्रेनर म्हणून प्रशिक्षण घेण्यास उपस्थित राहणेसाठी आपले स्तरावरुन अवगत करावे.

तसेच, भविष्यात या प्रणालीचा आवाका वाढणार आहे हे लक्षात घेता आपले कार्यालयातील कर्मचारी सुदधा सदर प्रणालीबाबत प्रशिक्षीत असणे अत्यंत गरजेचे आहे. आपले कार्यालयातील वरीष्ठ लिपीक किंवा त्यावरील हुददयाचे 2 कर्मचारी तसेच

आपले कार्यालयातील District Support Engineer यांनाही प्रशिक्षणासाठी उपस्थित राहुन सर्व बाबी समजावून घेणे आपेक्षित आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील प्रकल्पांच्या अडचणी सोडवणे यामुळे सोईचे होणार आहे.

प्रशिक्षण घेण्यासाठी जास्तीत जास्त विकसक CREDAI चे प्रतिनिधी व संबंधीत इच्छुक मंडळींना सदर प्रशिक्षण सदरासाठी उपस्थित राहुन प्रणाली समजावुन घेण्यासाठी आपल्या स्तरावरुन प्रोत्साहित करावे.

प्रशिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक सोबत जोडले आहे.

(गोविंद कराड)
नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय)
महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत- 1) नोंदणी उपमहानिरीक्षक (संगणक), नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालय यांना कार्यवाहीस्तव/ माहितीस्तव.

2) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक मुंबई,पुणे,ठाणे,नाशिक,औरंगाबाद यांना कार्यवाहीस्तव/माहितीस्तव.

ई-रजिस्ट्रेशन (Form Builder) प्रणाली संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी विभागवार कार्यशाळा वेळापत्रक खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1. | मुंबई विभाग-<br>मुंबई शहर, मुंबई उपनगर | 19.05.2022 व<br>दि.20.05.2022 | सकाळी 11.00 ते<br>सायंकाळी 6.00 पर्यंत |
| 2. | पुणे विभाग-<br>पुणे शहर, पुणे ग्रामीण, सोलापूर | दि.23.05.2022 व<br>दि.24.05.2022 | सकाळी 11.00 ते<br>सायंकाळी 6.00 पर्यंत |
| 3. | ठाणे विभाग-<br>ठाणे शहर, ठाणे ग्रामीण, रायगड, पालघर | दि.25.05.2022व<br>दि.26.05.2022 | सकाळी 11.00 ते<br>सायंकाळी 6.00 पर्यंत |
| 4. | नाशिक विभाग-<br>नाशिक | दि. 27.05.2022 | सकाळी 11.00 ते<br>सायंकाळी 6.00 पर्यंत |
| 5. | औरंगाबाद विभाग-<br>औरंगाबाद | दि. 31.05.2022 | सकाळी 11.00 ते<br>सायंकाळी 6.00 पर्यंत |